**CNR No.MHST120003722021**

## नियमित दिवाणी दावा नं.–१३४/२०२१ मधील नि.३६ वरील आदेश

१.. सदरचा अर्ज हा प्रतिवादी यांनी त्यांच्या विरूध्द पारित झालेला विना कैफियतीचा आदेश रद्दबातल होवून त्यांची कैफियत अभिलेखावर दाखल करून घेणेसाठी दाखल केलेला आहे.

२.. प्रतिवादी यांनी त्यांच्या अर्जात असे कथन केले आहे की, वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा त्यांच्या विरूध्द वाटपासाठी दाखल केलला आहे. प्रतिवादी हे पोट भरण्याकरता परगावी गेलेले असल्यामुळे त्यांना विहित वेळेत दाव्याबाबतची काहीही माहिती न मिळाल्यामुळे मुदतीत कैफियत देता आली नाही म्हणून त्यांच्या विरूध्द विना कैफियतीचा आदेश पारित झालेला आहे. म्हणून प्रतिवादी यांनी त्यांचे विरुध्द पारीत झालेला विना कैफियतीचा आदेश रद्द करुन सदरची कैफियत दाखल करुन घ्यावी अशी विनंती केली आहे.

३.. वादी यांनी सदर अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल करून अर्जास हरकत घेतली आहे व कथन केले आहे की, अर्जातील कारण हे संयुक्तिक नसून मोघम केले आहे. तसेच सदरचा दावा हा चौकशीस लागून अंतिम निकालावर असताना व पूर्वी प्रतिवादी यांना संधी असताना देखील प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला असल्यामुळे सदरचा अर्ज चालणार नाही. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, वादी ही महिला व जेष्ठ नागरीक आहे. त्यामुळे वादी यांनी सदरचा अर्ज नामंजूर करणेची विनंती केली आहे.

४.. प्रतिवादी व विधिज्ञांचा युक्तीवाद व अभिलेखाचे अवलोकनावरुन असे निदर्शनास येते की वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादींविरुध्द निरंतर मनाई आदेशासाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत

दावा हा युक्तीवादासाठी असताना प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. प्रतिवादींच्या कथनानुसार, प्रतिवादी हे पोट भरणेसाठी बाहेरगावी असल्याने त्यांना दाव्याची माहिती न मिळाल्यामुळे त्यांच्या विरूध्द विना कैफियतीचा आदेश पारित झालेला आहे. अभिलेखावरील कागदपत्रांचा विचार करता प्रतिवादी यांना दाव्यास कैफियत देण्यास विलंब झाला असल्याचे दिसून येत आहे. वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा निरंतर मनाई आदेशासाठी दाखल केलेला असल्याने व त्यामध्ये वादी व प्रतिवादी यांना हक्क अधिकार मिळणार असल्याने दाव्याचा निर्णय गुणावगुणावर होणेसाठी प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर घेणे व त्याकमी झालेला विलंब माफ करणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीमध्ये प्रतिवादी यांना झालेला विलंब माफ करुन त्यांची लेखी कैफियत दाखल करणेस परवानगी देणे हे न्यायाच्या दृष्टीकोनातून आवश्यक ठरणार आहे. सदरचा अर्ज नामंजूर केल्यास प्रतिवादी यांना सदर दाव्यात आपले म्हणणे दाखल करता येणार नाही व सदरचे प्रकरण कायम स्वरुपी निकाली निघणे कामी अडचण निर्माण होणार आहे. प्रतिवादी यांचेकडून झालेला उशीर हा ते पोट भरणेकरीता परगावी असल्याने व त्यांना बद्दलची माहिती नसल्याने सदरचा विलंब माफ होउन मिळणे आवश्यक ठरते. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. प्रस्तुत नि.३६ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांचे विरुध्द नि.१ ला पारित झालेला विना कैफियत चालविणेबाबतचा झालेला आदेश रद्द करण्यात येतो.

३. प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर घेणेत येत आहे.

*(खुल्या न्यायालयात न्यायसनावर घोषित करण्यात आला.)*

Rajiv Babasaheb Bahirwal — Digitally signed by Rajiv Babasaheb Bahirwal Date: 2023.06.15 17:39:28 +0530

म्हसवड. **( रा.बा.बहिरवाल )**

दि.१५.०६.२०२३ दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,म्हसवड.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | J.A. Patel, Stenographer (Grade-3) |
| Name of Court | R. B. Bahirwal, Civil Judge, Jr. Div, Mhaswad. |
| Date of Dictation | 15.06.2023 |
| Order signed by the P.O. on | 15.06.2023 |
| Order uploaded on | 15.06.2023 |